# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक २२.०५.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २१.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. कायद्यान्वये ०६ केसेसमध्ये ०६ ईसमांवर कारवाई करून ७,२१५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०२ ईसमावर कारवाई करून १०,८१०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,४६१ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,२२,८५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) अजनी पोलीसांची कामगिरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

मा. श्री. रविंद्रकुमार सिंघल पोलीस आयुक्त नागपुर शहर यांचे आदेशान्वये व मार्गदर्शनात संपुर्ण नागपुर शहरात मादक पदार्थ बाळगणारे व विक्री करणारे आरोपी विरोधात **“ऑपरेशन थंडर”** राबविण्यात येत आहे.

दिनांक २१.०५.२०२६ चे १३.३५ वा. ते १६.३० वा. चे दरम्यान, अजनी पोलीसांचे पथक पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, अन्न सुरक्षा अधिकारी यांचेसह पोलीस ठाणे अजनी हद्दीत, ओमकार नगर, द केक झोन दुकानासमोर सार्वजनिक रोडवर दुचाकी वाहन क्र. एमएच ४९ सीव्ही ९३८५ वर शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाखु विक्री करणाऱ्या इसमावर रेड कार्यवाही केली असता, आरोपी नामे प्रमोद रामेश्वर तितरे वय ५९ वर्ष रा. प्लॉट क्र. २३६, निरंजन नगर, बेलतरोडी हा त्याचे ताब्यात शासनाने प्रतिबंधीत केलेला सुगंधीत तंबाखु, पानमसाला वेगवेगळ्या कंपनीचा व फ्लेवरचे तंबाखु पाऊच विक्री करीता बाळगुन मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन विमल, राजश्री, केपी डबल ब्लॅक इत्यादी सुंगधीत तंबाखू व वाहन जप्त करण्यात आले. आरोपीस अधिक विचारपुस करुन त्याचे राहते घरी पाहणी केली असता, वेगवेगळया प्लास्टीक बोरीमध्ये वेगवेगळया कंपनीचा एकुण ८५ किलो ७०३ ग्रॅम प्रतिबंधीत तंबाखु, व सुगंधीत पानमसाला, किंमती १,३७,३६७/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ व सुगंधीत पानमसाला बेकायदेशीर व अवैधरित्या विक्री करीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन एकूण २,०१,७८२/— रु. चा मुद्येमाल जप्त करुन आरोपीविरूध्द फिर्यादी अन्न सुरक्षा अधिकारी श्री किरण रंगास्वामी गेडाम वय ५९ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे आरोपीविरूध्द कलम १२३,२२३,२७४,२७५ भा.न्या.सं.

सहकलम ५९ अन्न सुरक्षा मानके अधिनियम–२००६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री नरेंद्र हिवरे, सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली, वपोनि. नितीनचंद्र राजकुमार, पोउपनि. सिध्दांत मस्के, पोहवा मनोज, प्रकाश, नापोअं. अतुल, पोअं. राहुल व मपोअं रेश्मा यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे नवीन कामठी:– फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २०.११.२०२३ चे १२.०० वा., फिर्यादी सौ. मेघा रितेश धोपटे वय २९ वर्षे, रा. आकाशवानी, हनुमान मंदीरमागे, खैरी, कामठी, नागपूर हया तहसील कार्यालय, कामठी येथे त्यांचे वडीलांचे नावे असलेली गादा गाव येथील शेतजमीनीवर त्यांचे नाव चढविण्याकरीता गेल्या होत्या. तेथे त्यांना एक इसम भेटला व त्याने फिर्यादी यांना तु हरिश्चंद्रची मुलगी आहे काय, असे विचारुन त्याचे नाव स्वप्निल क्षीरसागर वय ३५ वर्ष रा. निमखेडा, कामठी नागपूर असे सांगितले. तसेच तो तहसील कार्यालय, कामठी येथे नौकरीवर आहे असे सांगून, फिर्यादीचा विश्वास संपादन करुन त्यांचे वडीलांचे नावे असलेल्या शेतीवर फिर्यादीचे नाव चढवून देतो असे खोटे सांगून त्याकरीता पैसे लागतील असे सांगीतले. तसेच त्याने फिर्यादीचे वडीलांचे शेतीचा सातबारा बॅक ऑफ इंडीया येथे गहाण असून त्याकरीता पैसे खर्च करावे लागतील व मोठे अधिकारी यांना पैसे द्यावे लागतात असे सांगून दिनांक २०.११.२०२३ चे १२.०० वा. ते दिनांक २१.०५.२०२६ पावेतो फिर्यादीकडून वेळोवेळी एकूण १५.०७,०००/– रु. घेतले. फिर्यादीचे काम न झाल्याने त्यांनी विचारणा केली असता आरोपीने नेहमी टाळाटाळ केली. आरोपीचा फोन बंद येत असल्याने फिर्यादी यांनी आरोपीबाबत तहसील कार्यालय, कामठी येथे जाऊन शहानिशा केली असता, स्वप्निल क्षीरसागर नावाचा कोणीही कर्मचारी तहसील कार्यालय, कामठी येथे नेमणूकीस नसल्याचे फिर्यादीस समजले. यातील आरोपी याने कोणत्याही शासकीय पदावर नसतांना खोटे सांगुन फिर्यादीकडून वडीलांचे शेतीवर त्यांचे नाव चढवून देण्याकरीता वेळोवेळी एकुण १५.०७,०००/–रू. घेवुन फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करून फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे पोउपनि विकास तिडके ९६३७४०२४११ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१६(२),३१८(४) भान्यास. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>१) पोलीस ठाणे अजनी</u> :–** दिनांक २१.०५.२०२६ चे १६.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे अजनी हद्दीत, मेडीकल चौक, विजय चव्हाण यांचे मयताचे सामान दुकानासमोर सार्वजनिक रोडवर एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ५० वर्षे वयाचे, रंग–गव्हाळ, बांधा–मध्यम, उंची ५ फुट ५ इंच, डोक्याचे केस काळे पांढरे, अंगात–काळे पांढरे चौकडीचा फुलबाहीचा शर्ट व खाकी रंगाचा पॅन्ट घातलेल्या वर्णनाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे अजनी येथे पोउपनि सचिन निंबाळकर यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे मानकापुर</u>:—** दिनांक २१.०५.२०२६ चे १४.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत पीटेसुर, गोधनी रोड येथे राहणारे फिर्यादी अब्दुल रज्जाक अब्दुल सत्तार वय ४९ वर्ष यांचा मुलगा अब्दुल सजेन अब्दुल रज्जाक वय ११ वर्ष हा घराशेजारी असलेल्या पीटेसुर खदानीचे पाण्यात पोहण्याकरीता गेला असता, खदानीचे पाण्यात बुडून मरण पावला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे मानकापूर येथे पोउपनि रोहन पाटील ७७२१८१५१३० यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**